पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९७०/२०१७
दिनांक : १५/०७/२०१७

प्रति,
मा.......................................
सदस्य, महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा दिनांक १८/०७/२०१७ रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा **मंगळवार** दिनांक **१८/०७/२०१७** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत – १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.
मा.महिला व बालकल्याण समिती सभा
कार्यपत्रिका क्रमांक – ७

दिनांक – १८/०७/२०१७ वेळ – दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक १८/०७/२०१७ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक ०४/०७/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०६) सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मार्फत प्रत्येक वर्षी महिलांना विविध व्यवसायांचे व्यवसाय प्रशिक्षण स्वयंरोजगारासाठी दिले जाते.राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे, पुणे ही सरकारमान्य संस्था असून ह्या संस्थेच्या वतीने विविध प्रकारच्या व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. सध्या अश्या प्रकारच्या व्यवसायांचे प्रशिक्षण देणा-या अनेक संस्था उपलब्ध असून त्यांची फी जास्त असल्याने इच्छा असून सुद्धा अशा प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभागी होणे सर्वसामान्य नागरिकास शक्य होत नाही. राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, ही शासकीय संस्था असल्याने प्रशिक्षणाचे दर इतर संस्थांच्या मानाने माफक ठेवण्यात आलेले आहेत. प्रामुख्याने हे प्रशिक्षण बेरोजगार तरुण, महिला बचत गटांच्या व इतर यासाठी उपलब्ध आहे. राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान ह्यासंस्थेने फ्लोरा नॅचरल्स ह्या संस्थेची नेमणूक हे सर्व अभ्यासक्रम संस्थेच्या आवाराच्या बाहेर (On Site) राबविण्या करता केलेली आहे. तरी ५ प्रकारचे हे अभ्यासक्रम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिलांसाठी प्रायोगिक तत्वावर राबविल्यास महिलांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकेल. अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या महिलांना राष्ट्रीय सुगी पश्चात तत्रज्ञान संस्थेच्या वतीने प्रशस्तिपत्रक देण्यात येईल. तरी प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ नुसार मा. महिला व बालकल्याण समितीच्या मान्यतेने धोरण निश्चित करण्यास मान्यता असावी. तसेच प्रपत्र ब नुसार राष्ट्रीय सुगी पश्चात संस्था, तळेगाव दाभाडे या केंद्र शासनाचे मान्यताप्राप्त संस्थेच्या मान्यताप्राप्त फ्लोरा नॅचरल्स या संस्थेमार्फत एकूण ५ विषयांचे प्रशिक्षण कार्यक्रम त्यांचे नावासमोर नमुद केलेल्या कालावधी, अभ्यासक्रम व दरानुसार आयोजन करण्यास व

त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक **१८/०७/२०१७** चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)



**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी – १८. नगरसचिव विभाग

क्रमांक : नस/४/कावि/९७०/२०१७

दिनांक : १५/०७/२०१७ चे लगत.

टिप – प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.

**प्रपत्र – अ**

( महिला व बालकल्याण समिती सभा विषय क्रमांक ०१ दि.१८/०७/२०१७ चे लगत)

उद्यान विभागामार्फत उद्याने विकसित करणे, ठिकठिकाणी वृक्षलागवड करणे व वृक्षांचे संवर्धन करणे व संगोपन करणे इ. कामकाज केले जाते. सदर कामाचे आवश्यक ज्ञान असलेले अधिकारी व कर्मचारी उद्यान विभागाकडे उपलब्ध आहेत. सदर क्षेत्रामध्ये ज्ञान/कौशल्य प्राप्त करुन महिलांना नोकरी/व्यवसाय या माध्यमातून उपजिविकेचे साधन प्राप्त होण्यास खुपच वाव आहे. त्यासाठी सदर क्षेत्रात महिलांसाठी प्रशिक्षण योजना राबविणे खुप गरजेचे आहे. मे.राष्ट्रीय सुगी पाश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे हया शासकीय संस्थेस पर्यावरण पुरक शेती/फलोद्यान या शास्त्रातील विविध व्यवसाय प्रशिक्षण देण्याचा अनुभव आहे. सदरची संस्था ही राष्ट्रीय दर्जाची असल्याने निविदा मागविण्याची गरज नाही. त्या मुळे सदरच्या शासकीय संस्थेमार्फत वस्तीपातळीवर महिलांच्या सोईनुसारच्या जागेत/उद्यानामध्ये सदरचे प्रशिक्षण देता येईल. सदरचे प्रशिक्षण तातडीने देणेकामी तसेच संस्था निवडीसाठी लागणारा प्रदिर्घ कालावधीचा विचार करता प्रशिक्षणास इच्छुक असलेली कुठलीही महिला प्रशिक्षणापासून वंचीत राहु नये, प्रशिक्षण लवकरात लवकर सुरु व्हावे या उद्येशाने मे.राष्ट्रीय कृषी पाश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे यांचेमार्फत थेट पध्दतीने मनपास्तरावर एकूण ५ विषयांचे प्रशिक्षण त्यांच्यामार्फत सादर अभ्यासक्रमानुसार शिकविण्यास मान्यता देण्यात यावी. सदरचे प्रशिक्षण हे १६ वर्षे पुर्ण केलेल्या व मनपा हद्यीमध्ये वास्तव्य असणा-या कुठल्याही उत्पन्न गटातील महिलांना त्यांचे आधारकार्ड, फोटो व एकूण प्रशिक्षण शुल्काच्या १०% रक्कम सहभाग शुल्क म्हणून भरुन त्यांना प्रशिक्षणात सहभागी होण्यास मान्यता देणेत यावी. त्यानुसार सोबतच्या प्रपत्र – ब मधील नमुद प्रशिक्षण विषय/तपशीलानुसार व दरानुसार (सर्व करांसहीत) दि.३१/०३/२०१८ अखेर पर्यंत प्रशिक्षण देणेकामी संस्था निश्चिती संस्थेमार्फत सदर अभ्यासक्रमानुसार दर इत्यादी निश्चिती संबंधित सर्व कार्यवाही ही उद्यान विभाग (पिं.चिं.मनपा) यांचे मार्फत होऊन सदर प्रशिक्षण मे.राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे यांचे मार्फत राबविण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच महिलांच्या ज्ञान कौशल्यामध्ये वाढ व्हावी ह्या उद्येशाने सदर योजनेचे आयोजन करण्यात येणार असल्याने तसेच आवश्यक ती सहभाग शुल्काची रक्कम भरुन महिला प्रशिक्षणास येणार असल्याने एकापेक्षा अधिक विषयाचे प्रशिक्षण देण्यास मान्यता देण्यात यावी. सदर प्रशिक्षण योजनेमध्ये आवश्यकतेनुसार बदल/ दुरुस्ती करण्याचे/योजना अंमलबजावणी संबंधीत योग्य ती कार्यवाही करुन प्रशिक्षण योजना राबविण्या संबंधिचे सर्व अधिकार मा.आयुक्त सो. यांना देण्यास व सदर योजने अंतर्गत होणा-या प्रत्यक्ष प्रशिक्षण खर्चास मान्यता देण्यात यावी. सर्व कामगार कायद्याची अंमलबजावणी करण्याची व त्याच प्रमाणे कागदपत्रे सादर करण्याचे संस्थेस बंधनकारक करण्यात यावे. संस्थेचे काम हे महिलांसाठी प्रशिक्षण आयोजित करणे हे असून संस्थेने विषयानुरुप दिलेले दर हे फक्त त्यांच्यासाठी जरी असले तरी महिलांच्या सबलीकरणासाठी व सक्षमीकरणासाठी, ज्ञान कौशल्यामध्ये वाढ होण्यासाठी, महिलांना नोकरी/ व्यवसाय करुन त्यांच्या कौटूंबिक व आर्थिक उत्पन्नात वाढ व्हावी हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्येश आहे. त्यासाठी संस्थेमार्फत प्रत्येक प्रशिक्षण वर्गात सहभाग घेतलेल्या महिलांना रोजगार/स्वयंरोजगारास प्रवृत्त करणे त्या संबंधित व्यवसाय उभारणी ते विक्री, विक्रीपाश्चात सेवा, तसेच जमाखर्च नोंदी, आवश्यक परवाने/दाखले इ.बाबत मोफत मार्गदर्शन करणे संस्थेला बंधनकारक करण्यात यावे. कोर्स करण्याचे ज्ञान/कुवत/क्षमता असलेल्या गरजु महिला सहभाग शुल्क भरून

प्रशिक्षणात सहभागी होणार आहेत त्यामुळे विशिष्ट अशा शैक्षणिक अर्हतेच्या अटीची आवश्यकता नाही. विशिष्ट अशा शैक्षणिक अर्हते अभावी महिलांना त्यांच्या इच्छेनुसार प्रशिक्षणात सहभागी होण्यापासून वंचित ठेवले अथवा ते वंचित राहिले असे होणार नाही. केवळ शैक्षणिक अर्हतेतून ज्ञानाची पातळी कळून येत नाही, त्यामुळे कुठलीही गरजू इच्छुक महिला प्रशिक्षणापासून वंचित राहू नये. प्रशिक्षणात सहभागी करुन घेत नाही अशा कुठल्याही प्रकारच्या तक्रारीस वाव राहू नये ह्या हेतूने कुठलीही विशिष्ठ शैक्षणिक अर्हता न ठेवता सर्व इच्छुक साक्षर महिलांना सदर प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्यास मान्यता देण्यात यावी. सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकामध्ये उद्यान विभागासाठी आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. त्यात ह्या लेखाशिर्षाचा समावेश आहे. तरी या लेखाशिर्षांतर्गत केलेल्या तरतुदीनुसार सदर प्रशिक्षणासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास व सदरचे प्रशिक्षण हे मे.राष्ट्रीय सुगी पाश्चात संस्था, तळेगाव दाभाडे यांचेमार्फत दि.३१/०३/२०१८ अखेर पर्यंतच्या कालावधीत राबविणेकामी व योजनेच्या अंमलबजावणीकामीच्या धोरणास मान्यता देणेत यावी.

----------

**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

**प्रशिक्षणाची यादी प्रपत्र – ब**

( महिला व बालकल्याण समिती सभा विषय क्रमांक ०१ दि.१८/०७/२०१७ चे लगत)

| अ.क्र. | प्रशिक्षणाचे नाव | प्रशिक्षण कालावधी दिवस आणि तास | शैक्षणिक पात्रता (अर्हता) | शुल्क प्रति लाभार्थी (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|---|
| ०१ | Terrace Gardening | तीन दिवस ०३ तास प्रतीदिवस | साक्षर | र.१२०० प्रती लाभार्थी |

**आभ्यासक्रम –** वनस्पती जीवनचक्र, वनस्पती शरीर विज्ञान शास्त्र, भाजीपाला बॅग, पौष्टिकबाग, किचन गार्डन, आंतर मशागत नियोजन, आराखडा आणि व्यवस्थापन, बियाणे प्रक्रिया, प्लँटींग मटेरियल, आंतर मशागत, ग्रोथ रेग्युलेटरचा वापर, पाण्याचे व्यवस्थापन, खताचे नियोजन, तण व्यवस्थापन, जमिनीचा कस, रोग व किडीचे व्यवस्थापन, कुंडयांचे प्रकार, शोभिवंत झाडे-वृक्ष, झुडपे, वेली, प्रुनिंग व ट्रैनिंग, बागकामाची अवजारे, थंड हवामानातील भाजीपाला, उष्ण हवामानातील भाजीपाला, जैविक खते, जैविक कीडनाशके.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | Compost & Manure Preparation | दोन दिवस ०३ तास प्रतीदिवस | साक्षर | र.८०० प्रती लाभार्थी |

**आभ्यासक्रम –** कंपोस्टचे वेगवेगळे प्रकार, कोंबडीखत, गांडूळखत, अळंबीखत, फार्मयार्ड मॅन्युअर, ऐरोबिक आणि एन एरोबिक कंपोस्टिंग, कंपोस्टिंगमधील वेगवेगळे सुक्ष्मजीव – बॅक्टरीया व बुरशी व इतर जीव, खताचे पॅकींग कसे करावे, बाजारपेठ कशी उपलब्ध करावी, कंपोस्टिंग तयार करण्याच्या पध्दती, घरगुती कच-यापासून खत तयार करणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **०३** | **बुके आणि हार तयार करणे. Bouquet and Garland Making, Bonsai Making सुक्या फुलांची रचना (Dry Flower arrangement)** | **दोन दिवस ०३ तास प्रतीदिवस** | **साक्षर** | **र.८०० प्रती लाभार्थी** |

**अभ्यासक्रम –** पुष्पगुच्छाचे विविध प्रकार, कट फ्लॉवर्स आणि लूज फ्लॉवर्स, शाकीय व पुनरुत्पादीत अवयव, बुके तयार करण्यासाठी वापरल्या जाणा-या वस्तु, थर्माकोल बॉल, सॅटिन रिबीन, चमकी, फ्लोरल डिंक, फ्लोरल होल्डर, रबर बॅन्ड, बुके तयार करण्यासाठी लागणारी उपकरणे – कात्री, सिकेटर्स, वेगवेगळी कंटेनर्स, बुके जास्तकाळ टिकण्यासाठी उपाय, विक्री व्यवस्था, सॅम्पल बुके तयार करणे, बोन्साय संकल्पना, बोन्सायच्या विविध शैली, अपराईट, कॅसकेड, मल्टिपल ट्री, फॉरेस्ट स्टाईल, टू ट्री आणि ट्रंक स्टाईल, राफ्ट स्टाईल, मिनीएचर, ड्राफ्ट वुड बोन्साय, एक्सपोज्ड रुट स्टाईल, बोन्सायसाठी वनस्पतीची निवड, कटिंग, ग्राफ्टिंग, लेअरिंग, रेफाईनिंग बोन्साय स्पेसिज, रुट, ट्रंक, फांद्या, पाने, बोन्सायसाठीची अवजारे व खते.

**सुक्या फुलांची रचना –** संकल्पना, फुले सुकवण्याच्या वेगवेगळया पध्दती, ब्लिचिंग, फुले रंगविणे, पॉटप्युरी, सुक्याफुलांच्या रचनेसाठीच्या फुलदाणी, सुकी फुले हस्तकला, सुक्या फुलांच्या रचनेसाठी लागणा-या वस्तूंची ओळख, हार, स्वाग, संचेट तयार करण्याची पध्दती, उपलब्ध बाजारपेठ.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **०४** | **बटन आळंबी लागवड, (बटन मशरुम कल्टिव्हेशन)** | **पाच दिवस ०३ तास प्रतीदिवस** | **साक्षर** | **र.२००० प्रती लाभार्थी** |

**अभ्यासक्रम –** आळंबीची ओळख, आळंबीचे प्रकार, आहारातील महत्व, पौष्टीक मुल्य, मशरुम युनिटचा आराखडा, कंपोस्टिंग फेज १, फेज २, स्पॉनिंग, केसिंग, ग्रोईंग, फ्लशिंग, काढणी, पॅकेजिंग, विविध प्रकारचे रोग, बाजारापेठेची माहिती, शासकीय योजना, अनुदान.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **०५** | **Tree Surveyor (वृक्ष सर्वेक्षक)** | **तीन दिवस ०३ तास प्रतीदिवस** | **साक्षर** | **र.१२०० प्रती लाभार्थी** |

**अभ्यासक्रम –** वनस्पती ओळखण्याचे तंत्र, जीआयएस प्रणालीबाबत माहिती, मोबाईलचा वृक्ष गणनेसाठी वापर, वेगवेगळया फ्लोरांची ओळख, फ्लोरा ऑफ महाराष्ट्र, फ्लोरा ऑफ वेस्टर्न घाट, फ्लोरा ऑफ कोल्हापूर, ट्रीज ऑफ पुणे, शोभेची झाडे, रस्त्याच्या कडेने लावण्यात येणा-या, उद्यानात लावण्यात येणा-या झाडांची ओळख, विषयांची व्याप्ती व उपयोग, व्यवसाय कसा करावा याबाबत मार्गदर्शन.

**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.